## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०७/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे ५.३० वा. दर. यातील फिर्यादी व तिच्या मैत्रीणी हया पांढऱ्याबोडी येथुन भंडारा कडे येत असता यातील आरोपी हा नेहमी त्याचा पाठलाग करुन फिर्यादीची छेळखानी करुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व पास्टे भंडारा येथे अप क्र. ००/१७ कलम ३४१,३५४(अ)(२)(३), ३५४ड(२) भादंवि. सहकलम ८,१२ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी कांरडे पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल स्लीप होवुन स्वत:चे मरणास व सोबत बसलेल्या इसमास जखमी केल्याने गुन्हा नोद . :–**

दिनांक १९/०६/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील मृतक आरोपी चालक हा आपले ॲक्टीव्हा गाडीने त्याचा मित्र गोपाल कंळबे सोबत डबलसिट पवनी कडुन भंडारा कडे डांबरी रोडने येत असता मृतक आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडुन अपघात झाल्याने मृतक हा गंभिर जखमी होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने व गोपाल कंळबे यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. नान्हे यांचे चौकशी अहवाल व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,२३७,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) जनावरे कोंबुन अवैध रित्या जनावरांची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील आरोपी वाहण चालकाने आपले ताब्यातील वाहण टाटा सफारी अवैध रित्या लालपांढऱ्या रंगाचे ०३ बैल जनावरे कोंबुन कब्जात घेवुन प्राण्यामुळे मानवी जिवीतास संभाव्य धोक्यापासुन सुरक्षित राहण्यास जाणीवपुर्वक टाळुन जनावरांचे उंचीच्या, रुंदीच्या जाडीच्या मानाने त्याना हालचाल करण्यास पुरेशी जागा नसतांनी जनावरे कत्तल खाण्याकडे नेत असल्याची शक्यता असल्याने तसेच वाहणांचे कोणतेही कागदपत्र नसल्याने व जनावराचे वैदयकीय प्रमाणपत्र जवळ न बाळगता अवैध रित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खडसे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८९ भादंवि. सहकलम (ड) प्राण्यांना निदर्यतेने वागगविण्याचा कायदा सहकलम सुधारीत कलम ५(अ)(१)(२)म.प्राणी. सं. कायदा सहकलम १३९/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) विवाहीतेला शारीरीक व मानसिक त्रास देवुन पैश्यासाठी त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०४/२०१२ पासुन १८/०७/२०१७ पर्यत यातील फिर्यादीचे लग्न आरोपी क्र. १ सोबत झाले असुन तिचे आरोपी क्र याने फिर्यादीचे अंगावरील दागीने आरोपी क्र. २ हीचे कडे ठेवण्यास देवुन २०,०००/–रु. माहेरुन घेवुन ये या कारणा वरुन मारपीट करुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन २०,०००/–रु.माहेरुन घेवन ये म्हणुन हुंडयासाठी त्रास दिल्याने ठाणा प्रभारी महिला ठाणा दुग (छ.ग) येथे अप क्र. ००/१७ क. ४९८(अ), ३४ भादंवि सहकलम ४ हुंडा प्रतीबंधक कायदा चे कागदपत्र प्राप्त झाल्याने व मा. पोलीस अधिक्षक सा. भंडारा यांचे पत्रा वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ),३४ भादंवि. सहकलम ४ हुंडा प्रतीबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) संगनमत करुन कंपनी मध्ये फिल्ड ऑफीसर व एरीया ऑफीसर असल्याचे भासवुन लोकांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०७/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन दि. २६/०६/२०१७ ला लोकमत वर्तमान पत्रा मध्ये शताब्दी फिनकाफ प्रा. लि. कंपनी मध्ये फिल्ड ऑफीसर व एरीया मॅनेजर अशी पदे रिक्त आहेत अशी जाहीरात देवुन फिर्यादी व ईतर ३० ते ४० लोकांना एजंट बनवुन व त्यांचा पुन्हा १० जनांचा ग्रुप बनवुन साखळी पध्दतीने प्रत्येक व्यक्ती कडुन ३०,००,०००/–रु. ची फसवणुक करुन पसार झाल्याने फिर्यादी हुतेश्वर सिताराम मेश्राम वय ३५ वर्ष, रा. खैरी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) क्षुल्लक कारणावरुन काचेचा ग्लॉस फेकुन मारुन कानाला व नाकाला मार लागुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०७/२०१७ चे १०.१५ वा. दर. यातील फिर्यादी पदमाकर रमेश कळूमकर वय २३ वर्ष, रा. गोसे खुर्द हा ५ वर्षा पासुन मधुबन बार अ‍ॅन्ड रेस्टॉरन्ट येथे वेटरचे काम करीत होता यातील आरोपी हा बार मध्ये दारु पिण्यास गेला असता त्याने फिर्यादीस चिवडा आण असे सांगीतले असता चिवडा उपलब्ध नसल्याचे सांगीतले या वरुन आरोपीने फिर्यादीचे अंगावर दारु फेकुन व काचेचे ग्लास फेकुन मारुन फिर्यादीचे डावे कानाला व नाकाचे बाजुला मार लागुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

७) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,करधा, तुमसर,पालांदुर व अडयाळ येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून ६२ लिटर हा.भ. दारू किंमती ५६००/–रु. तसेच २ लिटर ८८० मिली लिटर देशी दारू किंमती १५५६/–रु. असा एकुण किंमती ७१५६/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहे.

सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.